# नियमीत दिवाणी दावा क्र. ०१/२०२० मधील अर्ज नि.क्र.६२ वरील आदेश

१. वादीतर्फे प्रस्तुतचा अर्ज हा मयत प्रतिवादी क्र.१ रघुनाथ रामजी कोळी यांच्या वारसांना दाव्यामध्ये प्रतिवादी म्हणून सामील करण्याची परवानगी मिळण्यासाठी दाखल केलेला आहे.

२. प्रतिवादी क्र.२ ते ५ यांनी नि.६४ वर म्हणणे दाखल करुन प्रस्तुत अर्ज मंजूर करण्यास त्यांची हरकत नसल्याचे कथन केलेले आहे.

३. दोन्ही पक्षांचा युक्तीवाद ऐकला. अर्ज, म्हणणे व अभिलेखावर दाखल कागदपत्रांचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, प्रस्तुत अर्जात नमूद केल्याप्रमाणे प्रतिवादी क्र.१ रघुनाथ रामजी कोळी यांचे दिनांक १४/०६/२०२५ रोजी मौजे कर्की, ता. मुक्ताईनगर, जि. जळगांव येथे निधन झालेले आहे. शिवाय, वादीने प्रस्तुत अर्ज कायदयाने विहीत करुन दिलेल्या मुदतीत दाखल केलेला आहे. वरील सर्व बाबी व दाव्याचे स्वरुप पाहता मयत प्रतिवादी क्र.१ रघुनाथ रामजी कोळी यांचे वारसांना प्रस्तुत दाव्यात समाविष्ट करुन घेणे अत्यावश्यक असल्याचे दिसते. त्यामुळे मयत प्रतिवादी क्र.१ रघुनाथ रामजी कोळी यांचे वारसांना प्रस्तुत दाव्यात समाविष्ट करुन घेणे न्यायोचीत होईल. करीता, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे–

## आ दे श

१. प्रस्तुत अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. वादी यांनी प्रतिवादी क्र.१ रघुनाथ रामजी कोळी यांचे वारसांना कायदयाच्या तरतुदीनुसार १४ दिवसांचे आत प्रतिवादी म्हणून दाव्यात समाविष्ट करावे व दाव्याची दुरुस्त प्रत अभिलेखावर दाखल करावी.

PAWAR BALASAHEB GANGADHAR
Digitally signed by PAWAR BALASAHEB GANGADHAR
Date: 2026.01.22 16:57:03 +0530

(बी.जी.पवार)
दि. २२/०१/२०२६. दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर,
मुक्ताईनगर, जि. जळगांव.